**जनसंपर्क अधिकारी**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३६४ - २३** **दिनांक : - १८/१०/२०२३**

**७,७५,०००/- रुपये किंमतीचा मेफॅड्रॉन नावाचा अंमली पदार्थासह सराईत आरोपीत यास अटक करण्यात नालासोपारा पोलीसांना यश.**

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ, गुंगीकारक औषधीद्रव्ये विक्री बाबत जातीने लक्ष घालून कारवाई करणेबाबत वरीष्ठांनी वारंवार सुचना दिल्या होत्या. सदर आशयाचे संदर्भाने दिनांक १६/१०/२०२३ रोजी स.पो.नि. अमोल तळेकर यांना गुप्त बातमीरामार्फत माहीती मिळाली की, एक इसम हनुमाननगर, नालासोपारा पश्चिम येथे रस्त्यावर एका बुलेट दुचाकीवर बसुन कोणतातरी अंमली पदार्थ विकत आहे. सदर बातमीचा आशय वरीष्ठांना कळवून त्यांनी दिलेल्या आदेशान्वये लागलीच कारवाई करणेकामी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक व दहशतवादी विरोधी पथकातील अधिकारी, अंमलदार यांनी सापळा रचून आरोपीत यास त्याचे ताब्यातील मोटार सायकलीसह शिताफीने पकडले. नमूद ताब्यातील इसमांस त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अत्तेशाम उर्फ इतेशाम उर्फ शाम रफीक अन्सारी, वय-४७ वर्षे असे असल्याचे सांगीतले. सदरची बुलेट ही त्याचीच असून सदर बुलेट दुचाकीच्या हॅन्डलला अडकवलेल्या काळया रंगाची सॅकची पाहणी केली असता त्यामध्ये एका पारदर्शक प्लास्टीक पिशवीत पांढऱ्या रंगाची पावडर व रोख रक्कम मिळुन आली. नमुद इसमाचे ताब्यात मिळून आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | ७,७५,०००/- रु. | एका पारदर्शक पिशवीमध्ये मेफॅड्रॉन नावाचा अंमली पदार्थाची पांढऱ्या रंगाची पावडर एकुण वजन ७७.५० ग्रॅम मि.कि.सु. |
| २) | १,४०,५००/- रु. | भारतीय चलनातील नोटा ( ५०० रु, २००रु, १०० रुपये दराच्या चलनी नोटा ) |
| ३) | १,६०,०००/-रु. | एक काळपट हिरव्या रंगाची रॅायल एनफिल्ड कंपनीची क्लासीक ३५०सीसी मोटार सायकल क्र एम.एच. ०२ / एफ. क्यु. ५१४२ अशा वर्णनाची जु.वा.किं.सु. |
| | १०,७५,५००/- रु. | एकूण. |

इसम नामे अत्तेशाम उर्फ इतेशाम उर्फ शाम रफीक अन्सारी याचे कब्जात वरील वर्णनाचा १०,७५,५००/- रुपये मुद्देमाल बाळगला असतांना मिळुन आल्याने त्याचे विरुध्द सरकार तर्फे एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २१(क) प्रमाणे फिर्याद दाखल करुन आरोपीत यास दिनांक १७/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.निरी.अख्तर शेख करीत आहेत.

वरील नमुद आरोपीत हा सराईत गुन्हेगार असून त्याचेविरुध्द यापूर्वी नालासोपारा पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | गुन्हा रजि.नं.व कलम |
|---|---|
| ०१ | २०/२०१७, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २०, २१, २२, २५ प्रमाणे. |
| ०२ | १९२ /२०१८, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २०,२२ सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० कलम १८ (क) (अे) शिक्षा कलम २७ प्रमाणे. |
| ०३ | ७९/२०१९, एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २१ (ब), २९ प्रमाणे. |
| ०४ | ३०/२०२१, एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २१ (ब), २९ प्रमाणे. |
| ०५ | नालासोपारा पो.स्टे. गु.र.नं. I १४३/२०२२, एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २१ (क), २९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र मोकाशी, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपार पोलीस ठाणे, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि.पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.उप.निरी.अख्तर शेख, वैभव पवार, पो.हवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, प्रशांत साळुंके, पो.ना. अमोल तटकरे, पो.अं. बनसोडे, कल्याण बाचकर, आकाश पवार, प्रेम घोडेराव यांनी केलेली आहे.

